स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील मानव्य विद्याशाखेअंतर्गत 'इतिहास' विषयातील पीएच.डी. पदवीकरीता सादर करावयाचा शोधप्रबंधाचा प्राथमिक आराखडा

''मराठी साहित्यातून प्रतित होणारा शिवकाळाचा इतिहास : एक चिकित्सक अभ्यास'' (इ.स. 1630 ते 1707)

संशोधक

प्रा.किशन विठ्ठलराव मिराशे

बळीराम पाटील महाविद्यालय, किनवट

ता.किनवट जि.नांदेड-431804

मार्गदर्शक

प्रा.डॉ. रामभाऊ मुटकुळे

इतिहास विभागप्रमुख,

हुतात्मा बहिर्जी स्मारक महाविद्यालय,

वसमत

संशोधन केंद्र

ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी

ऑगस्ट-2021

''मराठी साहित्यातून प्रतित होणारा शिवकाळाचा इतिहास : एक चिकित्सक अभ्यास'' (इ.स. 1630 ते 1707) ''

प्रस्तावना :-

साहित्य हा समाजाचा आरसा असतो. समाजजीवनाचे काळानुसार बदलणारे प्रतिबिंब साहित्यात दिसते. त्यामुळे साहित्य हे समाज जीवनावर प्रभाव टाकणारे सर्वात प्रभावी साधन ठरते. एकोणिसाव्या शतकात ब्रिटिश सत्तेमुळे महाराष्ट्राचा पाश्चात्य संस्कृतीशी संबंध आला व सर्व परिस्थिती बदलून गेली. या बदललेल्या परिस्थितीत साहित्याकडे सामाजिक दृष्टीने पाहण्यास सुरुवात झाली. खरे तर मराठी साहित्याची सुरुवात शब्द रुपाने पाचव्या शतकातच झाली. वाक्यरुपाने नवव्या शतकात जोर धरला आणि ग्रंथरुपाने बाराव्या शतकात मराठी साहित्य उदयाला आले. खरे तर अकराव्या शतकात मराठी भाषेला ग्रांथिक स्वरुप प्राप्त झालेले दिसते. श्रीपती भट्ट (अंदाजे इ.स. 999 -इ.स. 1058) याने इ.स. 1850 मध्ये लिहिलेला 'ज्योतिषरत्नमाला' हा टीकाग्रंथ प्राचीनात प्राचीन असा पहिलाच उपलब्ध गद्य ग्रंथ असावा असे मानावयास हरकत नाही असे मराठी वाङ्मयकोशकार म्हणतात. यावरुन ग्रंथकार संस्कृत भाषेकडून मराठी भाषेकडे वळ्ले होते असे दिसून येते. हा उपक्रम अकराव्या शतकात सुरु झाला. यावरुन मराठी बोली मुर्त स्वरुपाला येऊन बाराव्या शतकात तिला प्रस्थापित भाषेचे स्वरूप प्राप्त झाले, असे म्हणावयास हरकत नाही. त्या भाषेच्या उदयाबरोबरच ती भाषा बोलणारा समाज हा स्थिर झाला होता. पाच-सहाव्या शतकापासून अकरा-बाराव्या शतकापर्यंत भारत आणि युरोप या दोन्ही ठिकाणी आजच्या प्रादेशिक भाषा उदयाला येत होत्या आणि वाढतही होत्या. त्या प्रगल्भ होऊन साहित्यही निर्माण करीत होत्या. या भाषा बोलणारे प्राकृतजन उदयाला आले होते.

नंतरच्या कालखंडात ऐतिहासिक रुपाने साहित्य, नाटक, कला, पोवाडे, लावणी ,गीत इत्यादी वाडमय प्रकारातून मानवाच्या कर्तृत्वाचा उल्लेख आढळतो.

साहित्य हे गद्यात्मक असो की पद्यात्मक त्याचा संबंध हा इतिहासाशी असो की पद्यात्मक त्याचा संबंध हा इतिहासाशी येतो. या संदर्भाने शिवकाळाचा इतिहासाचा प्रभाव हा मराठी साहित्यावर पडलेला दिसतो. अर्थातच मराठी साहितय प्रारंभी म्हणजे बाराव्या शतकात संस्कृतीचे वर्चस्व व त्यामुळे सर्वसामान्य, अज्ञानी लोकांची होणारी नागवण लक्षात घेता या जनसामान्यांना ज्ञान देणारे, त्यांच्या धर्म भावनेला उच्च विचारांचे अधिष्ठान मिळवून देणारे 'साहित्य' निर्माण होणे आवश्यक होते. त्यामुळे एकुणच, मराठी साहित्याचा विचार करता असे लक्षात येते की, मराठी साहित्याच्या निर्मितीत महानुभाव साहित्य हे एक मुख्य स्रोत आहे. या संदर्भाने तत्कालीन सामाजिक, राजकीय, धार्मिक परिस्थिती यांचाही प्रभाव अनुक्रमे मराठी साहित्यावर पडत गेल्याचे लक्षात येते.

मराठयांचा इतिहासात सर्वात प्रभावी व्यक्तिमत्व, मराठी सत्तेचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज असल्यामुळे त्यांच्यावर मोठया प्रमाणात ऐतिहासिक स्वरूपाचे लेखन झालेले आहे. मराठी सत्तेचे पहिले युवराज छत्रपती संभाजी महाराज यांच्या आकर्षक व्यक्तिमत्वामुळे त्यांच्याही संदर्भात विपूल अशा प्रकारचे ऐतिहासिक वाङ्मयाची निर्मिती झाली आहे. त्याबरोबरच छत्रपती राजाराम महाराज यांच्यावरही मराठी साहित्यात बऱ्याच प्रमाणात साहित्य निर्माण झालेले दिसते. याबरोबरच महाराणी ताराबाई यांच्याही जीवनावर आधारीत त्यांचा एकुणच इतिहासाची विस्तारीतपणे वाङ्मयीन साहित्यातून नोंद घेतल्याचे दिसते. त्यामुळे महाराष्ट्राच्या स्वराज्य निर्मितीत छत्रपती शिवाजी महाराजांनी जे योगदान दिले ते भारतातील विशेषत: महाराष्ट्रातील राजकीय परिस्थितीचे, समाजरचेनेचे, धार्मिक व आर्थिक बाबतीचे विश्लेषण करणे गरजेचे वाटते आहे.

साहित्य निर्मितीतून छत्रपती शिवाजी महाराजांवर अलिकडच्या काळातील विशेषत: एकोणिसाच्या शतकातील प्रतिइतिहास किंबहुना शिवइतिहासाचे सत्य स्वरुप मांडत असतांना, अनेक लेखकांनी ज्या पद्धतीने लेखन केले व लेखन वास्तवाशी

निगडीत नसल्याकारणाने संशोधकाने शोध घेऊन प्रस्तुत विषय छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी राजे, छत्रपती राजाराम राजे, महाराणी ताराबाई यांच्या बाबतीत जे काही साहित्यात अवास्तव मांडणी केलेली आहे ती खोडून काढण्याचा व वास्तववादी इतिहास जो लिखित स्वरुपात आहे त्या अनुषंगाने संशोधकाने या बाबतीत शोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. सर्वसाधारणपणे शिवकाळात परकीय, उच्चवर्णीय मुसलमान म्हणजे मोगल, आदिलशहा, निजामशहा आदि मुख्य राज्यकर्त होते. त्यांचे मंत्री, सल्लागार हे उच्चवर्णीय असत. त्यामुळेच गुणानुक्रमे त्यांच्या हातात प्रशासन व्यवस्था असलेली दिसते. हिंदु व मुसलमान या दोन्ही धर्मातील कष्टकरी, गरीब, शेतकरी जाती-जमातींवर यांचे शासन चाले. या सर्वांकडून मोठयाप्रमाणावर महसुलाची व कराची सक्तीची वसुली शासन करीत असत. यावरुन असे लक्षात येते की, छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या राजसत्तेचे ध्येय सामान्य जनता, शेतकरी व स्त्रियां यांच्या हिताचे ठेवले. या सर्व घटकांचे शिवपूर्वकाळात प्रचंड शोषण झालेले होते. त्यामुळेच छत्रपती शिवाजी महाराजांची कारकीर्द त्यांच्या समकालीन व पूर्वकालीन मध्ययुगीन राज्यकर्त्यापेक्षा वेगळी व उठून दिसते. अर्थात या संदर्भात संशोधकाने प्रकरण रुपाने याचा मागोवा घेतलेला आहे. तसेच छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावर मराठी साहित्यामध्ये विस्तृतपणे नाटके लिहिली गेली. तसेच कादंबऱ्या आणि कथांच्या माध्यमातून नाटक, कथा, कादंबरी या प्रकारातून संभाजी राजांची कामांध, बदफेली, व्यसनी, लहरी, खुनशी, तापट, क्रोधी, दुर्वर्तनी, दुनराचारी, राज्यक्षयास नेणारा अशी प्रतिमा रंगवलेली आहे. अशा प्रकाची अनैतिहासिक प्रतिमा निर्मण करुन रुजवण्याचे कार्य साहित्यातून झाले. हे लेखन इतिहासाचा विपर्यास करणारे असल्यामुळे समाजघातक आहे. छत्रपती संभाजी राजांच्या कार्यकर्तृत्वाची उपेक्षा करणारे आहे त्यामुळे संशोधकाने याबाबतीतही शोध घेऊन छत्रपती संभाजी राजेंचा खरा इतिहास

समाजासमोर आणण्यासाठी प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने शोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

याबरोबरच छत्रपती राजाराम महाराजांनी मराठी साम्राज्य टिकवून ठेवण्यासाठी प्रचंड शर्थीचे प्रयत्न केले. परंतु इतिहासकार, बखरकार व नाटककारांनी मात्र छत्रपती राजारामांविषयी पूर्वग्रह ठेऊन लिखाण केले. छत्रपती राजाराम महाराजांवर स्वतंत्रपणे ग्रंथलेखन फार कमी प्रमाणात असले तरी, विशेषत: बखरी, केशव पंडितांचा 'राजारामचरितम्', रियासतकार सरदेसाईंचा 'मराठी रियासत-खंड दुसरा (स्थिरबुद्धी राजाराम) ', वा.सी. बेंद्रेचा 'श्री छत्रपती राजाराम महाराज आणि नेतृत्वहीन हिंदवी स्वराज्याचा लढा' अशा मोजक्याच काही ग्रंथाची नावे आपणास सांगता येतील. मात्र यामध्ये देखील छत्रपती राजाराम महाराजांच्या कार्याला द्यावा तसा न्याय दिलेला नाही. या विषयावर इतिहासरकाराचे झालेले दुर्लक्ष पाहून पुढे जयसिंगराव पवार यांनी विस्तृतपणे लिखाण केले व मराठी साहित्यामध्ये 'शिवपुत्र छत्रपती राजाराम' या नावाने ग्रंथ प्रकाशित करून छत्रपती राजाराम महाराजांच्या कार्यालया न्याय देण्याचे काम त्यांनी केले. याही संदर्भाच्या अनुषंगाने संशोधकाने पुढे छत्रपती राजाराम महाराजांच्या चरित्राच्या संदर्भाने साहित्यातून जी काही टीका- टिप्पणी व अवास्तव लिखाण झाले याचाही शोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

त्याचप्रमाणे महाराणी ताराबाई यांच्या चरित्रावर देखील बऱ्याच प्रमाणात लिखाण झालेले आहे. त्यांच्यावरही प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे. मध्ययुगीन कालखंडात एका मराठा स्त्रीने पतीच्या अकाली निधनानंतर स्वराज्याची सर्व सुत्रे आपल्या हाती घेऊन मराठी राज्याचे कसे रक्षण केले. हे करीत असतांना मोगलांच्या विरोधात त्या कशा खंबीरपणे लढल्या याचीही सविस्तर मांडणी जयसिंगराव पवार यांनी आपल्या ताराबाई यांच्या लिखाणावरून केली आहे.

अशाप्रकारे मराठी साहित्यातून प्रतित होणारा मराठयांच्या इतिहासाची चिकित्सा करुन खरा इतिहास समाजापुढे मांडणे हाच प्रस्तुत संशोधनाचा हेतू आहे.

विषयाची निवड :-

मराठ्यांचा इतिहासावर आतापर्यंत अनेक इतिहासकारांनी संशोधन व लेखन केलेले आहे. तसेच मराठी साहित्याच्या निर्मितीतून कथा, कादंबऱ्या, पोवाडे, गीत यांच्याही माध्यमातून अनेक लेखकांनी छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराज, महाराणी ताराबाई यांच्यावरील विपूल असे साहित्य निर्माण झालेले आहे. परंतु, या साहित्यातून वरील छत्रपतींच्या प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न जो काही बखरकार, नाटककार, कादंबरीकार, इतिहासकारांनी, लेखकांनी केलेला आहे त्याचा शोध घेऊन संशोधक संशोधनात्मक लेखनातून मध्ययुगीन मराठ्यांचा इतिहासात मोलाची भर घालण्याचा प्रयत्न करणार आहे. तेव्हा अशा लेखकांच्या लेखनाचा विस्तृत मागोवा घेऊन हे सर्व लेखन किंवा हे सर्व साहित्य ज्या पद्धतीने चुकीचे लिहिल्या गेले व छत्रपतींची प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न केला गेला या पार्श्वभुमीवर प्रस्तुत संशोधनाद्वारे मराठी साहित्यात जाणूनबजून अशी साहित्यनिर्मिती करण्याचा प्रयत्न केला गेला या पार्श्वभूमीवर या सर्व बाबींची चिकित्सा करुन त्याचा शोध घेऊन प्रस्तुत विषय हा शोधप्रबंधासाठी निवडलेला आहे.

संशोधनाची उद्दिष्टये :

1) मराठ्यांच्या इतिहास लेखनाविषयीचा दृष्टीकोन स्पष्ट करुन छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराज, महाराणी ताराबाई यांच्यावर वस्तुनिष्ठ मांडणी करणे.

2) मराठी साहित्यात निर्माण झालेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचा शोध घेणे.

3) मराठी ऐतिहासिक साहित्य, कला, पोवाडे, नाटक इत्यादींच्या माध्यमातून छत्रपती संभाजी महाराजांच्या व्यक्तिमत्व व कार्यकर्तृत्वावर लेखक, इतिहासकार यांच्या लेखनातून झालेल्या अन्यायाचा प्रस्तुत संशोधनातून शोध घेणे.

4) छत्रपती संभाजी महाराजांच्या एकुण कार्याचे नव्याने पुर्नमुल्यांकन करणे.

5) मराठ्यांच्या इतिहासातील कर्तृत्ववान परतू दुर्लक्षित राहिलेल्या व्यक्ती उदा. छत्रपती राजाराम महाराज, कर्तत्ववान महाराणी ताराबाई यांच्यावरही दुर्लक्षित लिहिल्या गेलेल्या साहित्याचा मागोवा घेणे.

संशोधनाची गृहितकृत्ये :-

1) मराठी साहित्यातून छत्रपती शिवाजी महाराजांविषयी विपर्यस्त लेखन झाले.

2) मराठी वाङ्मयातून छत्रपती संभाजी राजांची अनऐतिहासिक प्रतिमा निर्माण झाली.

3) मराठी साहित्यातून छत्रपती राजाराम महाराजांच्या कार्यावर अन्याय झालेला दिसून येतो.

4) महाराणी ताराबाई मराठ्यांच्या इतिहासातील कर्तृत्ववान स्त्री राज्यकर्त्या होत्या.

5) शिवकाळाचा इतिहास उज्वल व कर्तृत्वसंपन्न आहे.

तथ्य संकलन :-

मानव्य विद्याशाखेत (सामाजिक शास्त्र) तथ्य संकलनाचे प्रमुख दोन प्रकार पडतात.

1) प्राथमिक स्त्रोत :-

यामध्ये ऐतहासिक कागदपत्रे, सरकारी कागदपत्रे, प्रत्यक्ष भेटी यांचा समावेश होतो.

2) दुय्यम स्त्रोत :-

यामध्ये वर्तमापत्रे, मासिके, वार्षिक अंक, संदर्भ ग्रंथ इत्यादींचा समावेश होतो.

प्रस्तुत विषयाचा अभ्यास करतांना प्राथमिक व दुय्यम दर्जाच्या साधनांचा वापर करण्यात येणार आहे.

संशोधनाचा कालावधी :-

मराठी साहित्यातून प्रतित होणाऱ्या मराठ्यांच्या इतिहासाचा अभ्यास करण्यासाठी इ.स. 1630 ते इ.स. 1707 हा काळ निश्चित करण्यात आला आहे. संबंधित संशोधन पूर्ण होण्यासाठी तीन वर्षाचा कालावधी अपेक्षित आहे.

संशोधन पद्धती :-

इतिहास हे एक मानव्य विद्याशाख्र (सामाजिक शास्त्र) असून त्याच्या अभ्यासासाठी चार पद्धतीचा वापर केला जातो.

1) सर्वेक्षणात्मक संशोधन पद्धती
2) प्रश्नावली संशोधन पद्धती
3) प्रत्यक्ष मुलाखत संशोधन पद्धती
4) संदर्भ ग्रंथ संशोधन पद्धती

यापैकी प्रस्तुत शोधप्रबंधासाठी उपरोक्त सर्वच संशोधन पद्धतींचा वापर करण्यात येणार आहे.

संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा :-

प्रस्तुत प्रबंधासाठी शिवकाळातील प्रेरणांचा, विविध टप्प्यांचा अभ्यास केलेला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्यक्षेत्र हे विस्तृत स्वरूपाचे असल्याने त्यांच्यावरील साहित्याच्या माध्यमातून जो काही इतिहास रेखाटण्याचा प्रयत्न झाला आहे त्या इतिहासाचा शोध घेऊन संशोधनाच्या दृष्टिकोनातून प्रस्तूत संशोधन केलेले आहे.

महाराष्ट्राच्या सत्ताकारणात छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराज व महाराणी ताराबाई यांनी केलेले कार्य, त्याग, बलिदान इतिहासाच्या माध्यमातून त्यांची मलीन केल्या केलेली प्रतिमा खोडून काढण्याचा प्रयत्न व त्याची चिकित्सा करण्याचा प्रयत्न प्रस्तुत संशोधनात केलेला आहे. यावरून छत्रपती संभाजी महाराजांची भूमिका, त्यांचे कार्य, त्यांनी केलेले बलिदान, महाराणी ताराबाई यांनी केलेले कार्य हे इतिहासाशी कसे निगडीत होते, वर्तमान बदलाच्या संदर्भात मराठी साहित्यातून प्रतित होणारा शिवकाळाचा इतिहास कसा बरोबर होता. हा कालखंड मुख्य समजून प्रस्तुत संशोधकाने संशोधनासाठी हा विषय व इ.स. 1630ते इ.स. 1707 हा कालखंड निश्चित केला आहे.

संशोधन विषयाचे महत्व :-

प्रस्तुत संशोधनाच्या आधारे छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराज, महाराणी ताराबाई यांना एका विचाधारेच्या चौकटीत शिवकाळाचा मागोवा घेऊन मराठी साहित्यातून त्यांच्यावर जे लिखाण झालेले आहे, त्यात कादंबरी , नाटक, बखर,पोवाडे यांच्या माध्यमातून जी पूर्वग्रहदुषित एकांगी मांडणी कशी चुकीच्या गृहितकांवर आधारीत होती, त्याचा वेध घेऊन खरा इतिहास समजण्यास मदत होइल व त्या विरोधातील प्रतिक्रिया म्हणजेच खरा इतिहास समजण्यास मदत होईल व त्या विरोधातील प्रतिक्रिया म्हणजेच खरा इतिहास, वास्तववादी इतिहासलेखन समजून घेण्यासाठी ग्रंथरुपाच्या माध्यमातून, पाठ्यपुस्तकातून शिवकाळाचा इतिहास व एकांगीपणे जे काव्य लिहिले गेले याचाही शोध घेतल्या गेला आहे. शिवकाळाची मिथके व वास्तवता समजून घेण्यासाठी जे मराठी साहित्य निर्माण झाले. लेखकांचा, बखरीकारांचा, कादंबरीकारांचा पूर्वग्रहदूषितपणा, कावेबाजपणा लक्षात घेण्यासाठी प्रस्तुत शोधप्रबंधाचा उपयोग होईल. स्वातंत्र्यपूर्व तसेच स्वातंत्र्योत्तर काळात छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती

राजाराम महाराज व महाराणी ताराबाई यांचे मराठी सत्तेत कसे योगदान होते व वर्तमानाच्या संदर्भात त्यांचे विचार समजून घेण्यासाठी व मराठी साहित्यात त्यांची प्रतिमा कशी चुकीची निर्माण केली गेली याही संदर्भात चिकित्सा होणे गरजेचे असल्याकारणाने प्रस्तुत शोध महत्वपूर्ण असल्याचे दिसून येते.

संशोधनाचा आराखडा :-

प्रकरण पहिले : विषयाची पार्श्वभूमी व अभ्यासाचे लक्ष्य

प्रकरण दुसरे : शिवकाळातील विपर्यस्त एकांगी विचारधारेतील छत्रपती शिवाजी महाराजांवरील लेखन

प्रकरण तिसरे : कथा, कादंबरी व नाटकातून निर्माण करण्यात आलेली छत्रपती संभाजी महाराजांची प्रतिमा

प्रकरण चौथे : छत्रपती राजाराम महाराजांविषयीचे इतिहास लेखन

प्रकरण पाचवे : महाराणी ताराबाई यांच्याविषयाची साहित्य लेखन

प्रकरण सहावे : उपसंहार

टीप : संशोधनाला जशी गती येईल तसे संशोधन आराखडयात थोडाबहूत बदल संभवतो.

संदर्भसूची : -

1) English records of Shivaji, Shivcharitra Karyalaya, 1931
2) Mehendale Gajanan Bhaskar, Shivaji His Life and Times, Param Mitra Publication, Thane (W), First Edition, 2011
3) Sarkar Jadunath, House of Shivaji, Sarkar M.C. & San. Ltd. Third Edition, 1955.
4) Sarkar Jadunath, Shivaji and His Times, Ed. Sixth Calcutta, 1961.
5) जोग स.श्री. (संपा.), मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड चौथा, महाराष्ट्र साहित्य प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती.
6) जोशी शं. ना. (संपा), शिवकालीन पत्रसार-संग्रह, खंड-3, भारतीय इतिहास संशोधन मंडळ, स्वीय ग्रंथमाला, पुणे, 1937
7) जोशी शं. ना. (संपा), संभाजीकालीन पत्रसार-संग्रह, खंड-3, भारतीय इतिहास संशोधन मंडळ, स्वीय ग्रंथमाला, पुणे, 1937
8) मारवाडे प्रा.नरेंद्र, सोलापूरे प्रा. सुशिला, मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा इतिहास (प्रारंभ ते 1600), कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, 2009
9) शिखरे चंद्रशेखर, प्रतिइतिहास (शिवइतिहासाचे सत्यस्वरूप), जिजाई प्रकाशन, पुणे, पाचवी आवृत्ती, 2011
10) सुंठणकर बा.रं., महाराष्ट्रीय संतमंडळाचे ऐतिहासिक कार्य, लोकवङ्मय गृह, मुंबई, तिसरी आवृत्ती, 2008

संशोधक

प्रा.किशन विठ्ठलराव मिराशे
बळीराम पाटील महाविद्यालय, किनवट
ता.किनवट जि.नांदेड-431804

मार्गदर्शक

प्रा.डॉ. रामभाऊ मुटकुळे
इतिहास विभागप्रमुख
हुतात्मा बहिर्जी स्मारक महाविद्यालय,
बसमत